दिनांक १६-०८-२०१७

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग

**( जिल्हाधिकारी कार्यालय रोहयो शाखा सोलापूर नोटीस बोर्ड)**

# जाहीर प्रसिध्दी

विषय :- सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविणेबाबत.
जनसुनावणीसाठी व्हिडिओ रेकॉर्डिग करण्याकामी दरपत्रके मागविण्याबाबत

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी **सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, पंढरपूर, मोहोळ, बार्शी** तालुक्यामध्ये सामाजिक अंकेक्षण प्रक्रिये अंतर्गत जनसुनावणीचे सकाळी १०.०० वाजले पासून ते जनसुनावणी संपेपर्यत व्हिडिओ रेकॉर्डिंग करावयाचे आहे. त्याकामी दरपत्रके (सर्व करांसहीत) मागविण्यात येत आहेत. सदरच्या रेकॉर्डिंगच्या प्रत्येकी ४ प्रती (सीडी) कार्यालयासाठी आवश्यक आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. दरपत्रक सादर करताना सर्व करांसहीत दर नमूद करावेत. त्याव्यतिरिक्त कोणतीही रक्कम कार्यालयाकडून देय होणार नाही.
२. दिनांक १५-०९-२०१७ रोजी संबंधित तालुक्यामध्ये निश्चित केलेल्या ठिकाणी उपस्थित राहून व्हीडीओ रेकॉर्डींग करणे आवश्यक आहे.
३. व्हिडीओ रेकॉर्डिग करण्याच्या ठिकाणी जाण्याकामी / येण्याकामी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात येणार नाही. तसेच रेकॉर्डींग करण्याच्या ठिकाणी उपस्थित राहण्याकामी वाहन भाडे खर्च देण्यात येणार नाही. संबंधितांनी निश्चित दिलेल्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.
४. दरपत्रक धारकांनी दरपत्रका सोबत त्यांचे स्वत:चे / संस्थेचे / कंपनीचे पॅन कार्ड जोडावे.
५. जनसुनवाणीचे केलेल्या व्हिडिओ रेकॉर्डिंगवर संस्थेस / कंपनीचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. तसेच जनसुनावणीचे केलेल्या व्हिडिओ रेकॉर्डींग इतर कोणत्याही खाजगी व्यक्ती / संस्था यांना उपलब्ध करून देऊ नये. व्हिडीओ रेकॉर्डिंगचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्था / व्यक्ती विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
६. प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी कोणतेही दरपत्रक स्वीकृत करण्याचा किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीत यांना राहतील.

**दरपत्रके सादर करण्याचे व उघण्याचे ठिकाण**

१. दरपत्रके दिनांक १६/०८/२०१७ ते दिनांक २४/०८/२०१७ रोजी दुपारी ३.०० पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) दुपारी ३-०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय रोहयो शाखा सोलापूर येथे सादर करावीत.
२. दरपत्रके दिनांक २८/०८/२०१७ रोजी दुपारी ४-०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय रोहयो शाखा सोलापूर येथे उपजिल्हाधिकारी यांचे कक्षात उघडण्यात येतील.

स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी सो. सोलापूर यांची स्वाक्षरी असे.

Rali

**जिल्हाधिकारी सोलापूर करीता**